# FREE MCQ PDF

Q1. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोठे झाला?

(a) सांगली

(b) कोल्हापूर

(c) सातारा

(d) पुणे

Q2. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कोणत्या संस्थेची स्थापना केली?

(a) रयत शिक्षण संस्था

(b) भाऊराव शिक्षण संस्था

(c) पाटील शिक्षण संस्था

(d) यापैकी नाही

Q3. कर्मवीर भाऊराव पाटील यांना कोणत्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले?

(a) पद्मभूषण

(b) पद्मश्री

(c) भारतरत्न

(d) महाराष्ट्र भूषण

ADDA 247 MARATHI

Q4.खालील विधाने विचारात घ्या.

1. साताऱ्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी एक मोठे वसतिगृह स्थापन केले.
2. 25 फेब्रुवारी 1927 रोजी महात्मा गांधींच्या हस्ते या वसतिगृहाचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस 'असे नामाभिधान झाले.

(a) विधान 1 सत्य आहे

(b) विधान 2 सत्य आहे

(c) दोन्ही विधाने असत्य आहे

(d) दोन्ही विधाने सत्य आहेत

Q5.'तुम्ही आम्हाला पडीत जमीन द्या आम्ही तेथे सोने उगवून दाखवू' हे उद्‌वार खालीलपैकी कोणाचे आहे?

(a) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(b) कर्मवीर भाऊराव पाटील

(c) महर्षी कर्वे

(d) न्या.रानडे

**Solutions**

S1. Ans (b)

Sol. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज गावी झाला.

S2. Ans (a)

ADDA 247 MARATHI

Sol. कर्मवीर भाऊराव पाटील (२२ सप्टेंबर १८८७ - ९ मे १९५९) हे महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

- सामूहिक शिक्षणाचे पुरस्कर्ते असलेल्या भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.
- शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची प्रगती होवू शकणार नाही हे ओळखून पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील अण्णा यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.
- स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद, कमवा आणि शिका या मुल्मंत्रातून तयार झालेल्या अनेक विद्यार्थ्यांनी यशाची विविध शिखरे पादाक्रांत केली आहे

S3. Ans (a)

Sol. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसारासाठी दिले.

- महाराष्ट्रातील एक प्रेरणादायी शिक्षणयात्री म्हणून ते ओळखले जातात.
- महाराष्ट्रातील जनतेने त्यांना कर्मवीर (कृतींचा राजा) ही उपाधी देऊन सन्मानित केले.
- भारत सरकारने १९५९ मध्ये पद्मभूषण हा भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन आणि १९८८ मध्ये त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रकाशित करून भाऊराव पाटील यांचा सन्मान केला.

S4. Ans (d)

Sol.1. साताऱ्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी एक मोठे वसतिगृह स्थापन केले.

हे विधान पूर्णपणे सत्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 1924 साली साताऱ्यात 'छत्रपती शाहू व नेर्ले कार्ले बोर्डिंग वसतिगृह' नावाचे एक मोठे वसतिगृह स्थापन केले. हे वसतिगृह गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुविधा पुरवण्यासाठी स्थापन करण्यात आले होते.

2. 25 फेब्रुवारी 1927 रोजी महात्मा गांधींच्या हस्ते या वसतिगृहाचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस 'असे नामाभिधान झाले.

हे विधान पूर्णपणे सत्य आहे. 25 फेब्रुवारी 1927 रोजी महात्मा गांधींच्या हस्ते या वसतिगृहाचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' असे नामाभिधान करण्यात आले.

निष्कर्ष:

वरील दोन्ही विधाने पूर्णपणे सत्य आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी साताऱ्यात 'छत्रपती शाहू व नेर्ले कार्ले बोर्डिंग वसतिगृह' नावाचे वसतिगृह स्थापन केले आणि 25 फेब्रुवारी 1927 रोजी महात्मा गांधींच्या हस्ते या वसतिगृहाचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' असे नामाभिधान करण्यात आले.

S5. Ans (b)

Sol.हे उद्गार कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या भाषणातील आहेत.

ADDA 247 MARATHI

- कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण आणि सहकार यांच्या माध्यमातून समाजाची उन्नती करण्यावर भर दिला.
- त्यांनी मागासवर्गीय आणि गरीब लोकांना शिक्षणाची आणि आर्थिक स्वावलंबनाची संधी देण्यासाठी अनेक प्रयत्न केले.

ADDA 247 MARATHI